# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२८२८९९६, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : www.mjp.maharashtra.gov.in

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 20e                                          १८ फेब्रुवारी, २०१६

// परिपत्रक क्र. १७४ //

विषय : पाणी पुरवठा तसेच मलनि:सारण योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या यांत्रिकी कामांच्या मंजुरीबाबत.

**प्रस्तावना :**

मजीप्रामार्फत विविध पाणी पुरवठा व स्वच्छता योजनांची अंमलबजावणी केली जाते. बहुतांश योजनांमध्ये पंपिंग मशिनरी, पॅनल बोर्ड, ट्रान्सफॉर्मर व अनुषंगिक केबलिंग तसेच काही ठिकाणी जलमापक बसविणे, ऑटोमेशन इ. कामांचा समावेश असतो. या कामांच्या गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीची जबाबदारी मजीप्रामधील यांत्रिकी/ विद्यूत अभियंत्यांवर असते. अशा कामांच्या नियोजन व अंमलबजावणीसंबंधी वेळोवळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तथापि, विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी करताना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. यांत्रिक कामांबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
२. सर्व प्रकारच्या योजनांच्या बाबतीत अंदाजपत्रके व आराखडे, निविदा प्रपत्रे, अतिरिक्त बाबी, वाढीव परिमाणे इ.च्या बाबतीत यांत्रिकी कामे, ऑटोमेशन, जलमापके बसविणे, स्काडा अशा प्रकारच्या कामांना सक्षम यांत्रिकी अभियंत्याची मान्यता घ्यावी.
३. मजीप्रामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेल्या योजनांच्या बाबतीत, यांत्रिकी शाखेशी संबंधित कामांकरिता सक्षम यांत्रिकी अभियंत्यांची मान्यता घेण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्थांची विकास कामे अथवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मजीप्रामार्फत करण्यात येत असलेली कामे यामध्ये यांत्रिकी कामांचा समावेश असल्यास सक्षम यांत्रिकी अभियंत्याची मान्यता घ्यावी.

५. यांत्रिक कामांशी संबंधित काही बाबींचा दरसुचीमध्ये समावेश नसल्यास करावा लागणाऱ्या दरपृथ:करणास (Rate Analysis) अधीक्षक अभियंता (यां.) यांची मान्यता घेण्यात यावी.

६. योजनांची अंदाजपत्रके व आराखडे, अतिरिक्त बाबी, अतिरिक्त परिणामे, निविदा प्रपत्रे व यांत्रिकी कामांचा समावेश असलेल्या कोणत्याही प्रस्तावास मान्यता देण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी यांत्रिकी कामांना संबंधित यांत्रिकी अभियंत्याची मान्यता असल्याची खात्री करावी. उपरोक्त सुचनांचे कसोशीने पालन करावे. अन्यथा, संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

प्रत : मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती यांना माहितीसाठी.

प्रत : अधीक्षक अभियंता, मजीप्रा, ठाणे/ पुणे/ सांगली/ नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद/ पनवेल/ लातूर/ नांदेड/ अमरावती/ अकोला/ नागपूर/ चंद्रपूर यांना माहितीसाठी.

प्रत : अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), मजीप्रा, ठाणे/ नागपूर यांना माहितीसाठी.

प्रत : कार्यकारी अभियंता, (सर्व)

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१ रवाना 20 FEB 2016